# योहानाला जगाचा शेवट दिसला

येशू त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या मुलाचे स्वागत करण्यास तत्परतेने ऊभा आहे.

**प्रार्थनाः** ''प्रिय प्रभू, दिलेल्या स्वर्गाच्या अभिवचनाबद्दल मुलांना आनंद करण्यास कृपा करून साहाय्य कर.''

मुलांचे वय आणि आध्यात्मिक जाणीवेची पातळी ह्यांना अनुरूप असे कोणतेही शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

मोठ्या मुलाने किंवा शिक्षकांनी योहानाला झालेला स्वर्गाचा दृष्टांत हा वृत्तांत प्रकटी 20:11 ते 21:4 आणि 21:22 ते 22:5 मधून वाचून दाखवावा किंवा सांगावा या दृष्टांतात शेवटच्या काळात स्वर्गात व पृथ्वीवर काय होणार आहे हे देवाने प्रकट केले आहे.



पुढील प्रश्न विचारा (प्रत्येक प्रश्नापुढे उत्तर दिलेले आहे.)

- मरण पाविलेल्या सर्व लोकांचे काय झाले? (पाहा प्रकटी 20:12)
- जीवनाच्या पुस्तकात नाव नसलेल्या लोकांचे काय झाले? (20:15)
- नवे यरूशलेम आमचे नवे घर कसे दिसते? (21:2)
- कोणत्या गोष्टी स्वर्गात कधीच घडणार नाहीत? (21:4)
- मंदिर, सूर्य व चंद्र का असणार नाहीत? (21:22-23)
- मोठ्या नगरीच्या वाटेवर मध्यभागी कोणत्या दोन गोष्टी आहेत? (22:1-2)

**उजळणी**

- आपल्याला स्वर्गात कोणकोणत्या गोष्टी दिसणार आहेत? (देव, पांढरे शुभ्र राजासन, पुस्तके, येशू, प्रकाश, मरण पाविलेले लोक, एक सुंदर नगरी, एक नदी, जीवनाचे झाड)
- स्वर्गात आम्हाला कोणत्या गोष्टी दिसणार नाहीत? (मृत्यू, नरक, शोक करणे, रात्र, सूर्य, चंद्र, पातक, आजार)

1. **योहानाच्या स्वर्गाच्या दृष्टांताचे नाट्यीकरण करा.**
   - मुलांना ही नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करून व्यवस्था करा.
   - शिकविण्याच्या वेळात मुलांकडून नाटिकेची तयारी करून घ्या.
   - तुम्ही सर्व भूमिका केल्या पाहिजेत असे नाही.
   - मोठ्या मुलांनी लहानांच्या तयारीसाठी मदत करावी.
   - मोठ्या मुलांनी किंवा प्रौढांनी सुवार्तिक व निवेदक ह्या भूमिका कराव्यात.
   - लहान मुलांनी मित्रांच्या भूमिका कराव्यात.

**निवेदक** प्रकटी 20:11-15 मधून दृष्टांताचा पहिला भाग सांगून म्हणा ''सुवार्तिक आपल्या मित्रांना काय सांगतो ते ऐका.''

**सुवार्तिक:** ''मी प्रकटीकरणाचे पुस्तक वाचत होतो. भविष्यात आपण पांढऱ्या शुभ्र अशा आपल्या थोर राजासनावर बसलेल्या देवाला पाहणार आहोत.''

**मित्र क्र. 1:** ''देव प्रत्येकावर प्रीती करतो तो प्रत्येकाला स्वर्गात घणार आहे का?''

**सुवार्तिक:** ''जीवनाच्या पुस्तकात नावे असणाऱ्या विश्वासणाऱ्यांनाच फक्त स्वर्गात प्रवेश मिळणार आहे.''

**मित्र क्र. 2** ''मी येशूवर प्रेम करतो पण कधी कधी मी वाईट गोष्टी करतो. स्वर्गातही मी पाप करीत राहणार का?''

**सुवार्तिक:** ''नाही, देव तुला बदलून टाकणार आहे. आपण जे जे करतो ते ते तो पुस्तकात लिहून ठेवतो. आमच्या वाईट कृत्यांचा न्याय करण्यात येईल आणि त्या मागे ठेवल्या जातील. आम्ही केलेल्या चांगल्या कामांचे देव आम्हाला प्रतिफळ बक्षीस देणार आहे.''

**मित्र क्र. 3:**

**सुवार्तिक:** ''जीवनाच्या पुस्तकामध्ये ज्यांची नावे नाहीत अशांना अग्नीच्या सरोवरात टाकण्यात येईल.''

**मित्र क्र. 3:** ''येशूने त्याच्या जीवनाच्या पुस्तकात माझे नाव लिहावे अशी माझी इच्छा आहे.''

**निवेदक:** प्रकटी 21:1-4 मधून दृष्टांताचा दुसरा भाग सांगून म्हणा, ''सुवार्तिक आपल्या मित्रांना काय सांगतो ते ऐका.''

**सुवार्तिक:** ''स्वर्ग खूप सुंदर एखाद्या आनंदी, सुंदर अशा वधू सारखा असणार आहे.''

**मित्र क्र.** 4 ''कदाचित देव मला स्वर्गात घेणार नाही, माझ्या जीवनात बराच त्रास आणि दुःखे आहेत.''

**सुवार्तिक:** ''देव तुझ्या सर्व वेदना आणि दुःख दूर करील. या जीवनातील सर्व वाईट गोष्टी मागे सोडल्या जातील.''

**मित्र क्र.** 4: जिथे कोठे दुःख वेदना नसतील अशा ठिकाणी मला जायचे आहे.''

**निवेदक:** प्रकटी 21:22 ते 22:6 मधून वृत्तांताचा तिसरा भाग सांगून म्हणा, ''मित्र काय म्हणतात ते ऐका.''

**मित्र क्र.** 5: ''स्वर्गात देवाची उपासना करण्यासाठी खूप मोठे मंदिर असेल का?''

**सुवार्तिक:** ''नाही तेथे मंदिर असणार नाही. देव आमच्याबरोबर राहणार आहे आणि तोच आमचे मंदिर असणार. त्याचा प्रकाशच इतका तेजस्वी असेल की सूर्याची किंवा चद्राची गरजच उरणार नाही.''

**मित्र क्र.** 5: ''मग तिथे वर झाडे किंवा नद्या नसणार.''

**सुवार्तिक:** ''तिथे स्वर्गाच्या मध्यभागी सुंदर अशी जीवनाच्या पाण्याची नदी आणि जीवनाचे झाड असणार.''


**सर्व मित्र मिळून:** ''आम्हाला तिथे जाऊन येशूच्या बरोबर राहायचे आहे! येशूच्या नावाची स्तुती सदोदित होत राहो!''

**निवेदक:** नाटिकेसाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

**प्रश्न:** मुलांनी हे नाट्यीकरण प्रौढांसमोर सादर केले असेल तर त्यांनी वर दिलेले प्रश्न प्रौढांना विचारावेत. स्वर्गात आणखी इतर कोणत्या गोष्टी असाव्यात अशी त्यांची अपेक्षा आहे? हेही विचारा.

**कविता** तीन मुलांना प्रकटी 19:6,7 व 8 मधून प्रत्येकी एक वचन म्हणायला सांगा.

मुलांना स्वर्गात वाढणाऱ्या जीवनाच्या झाडाचे साधे चित्र काढण्यास सांगा, हे चित्र त्यांनी उपासनेच्या वेळी मोठ्या माणसांना दाखवून ह्या जीवनाच्या झाडाद्वारे स्वर्गात देवाकडून आरोग्य मिळणार असल्याचे सांगा.



देवाचा अखेरचा न्यायनिवाडा आणि स्वर्ग याविषयी मोठ्या मुलांना कविता किंवा गीत लिहिण्यास सांगा.

मोठ्या मुलांनी प्रकटी 21:3-4 तर लहान मुलांनी वचन 4 पाठ करावे.

**प्रार्थना:** ''प्रिय प्रभू, तू प्रेषित योहानाला स्वर्गाचा दृष्टांत दाखविलास याबद्दल तुला धन्यवाद देतो. आम्हाला भविष्याचे भय वाटत नाही. येशू पाप आणि सैतानावर विजयी होणार आहे. स्वर्ग अत्यंत सुंदर असणार आहे. तिथे आमची तुझ्याशी भेट होणार आणि आम्ही सदोदित तुझ्या बरोबर राहणार.''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net